पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी४११०१८ -
सामान्य प्रशासन विभाग
दूरध्वनी क्र६७३११२३-०२० .
Email Id prashasan@pcmcindia.gov.in



विधानमंडळ कामकाज / कालमर्यादा / अतितातडीचे

क्र.साप्रवि/१०-अ/कावि/ ४५६/२०२६
दिनांक - २०/११/२०२६

कार्यालयीन परिपत्रक,

विषय :- मा.महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२६ चे हिवाळी अधिवेशन, नागपूर संबंधित विशेष कामकाज प्राथम्य क्रमाणे हाताळणेबाबत....

संदर्भ :- महाराष्ट्र शासन प्राकृतिक प्रकाशन अधिसूचना दि.२९ ऑक्टोबर, २०२६

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२६ चे हिवाळी अधिवेशन दिनांक ०७ डिसेंबर, २०२६ पासून सुरु होत असलेबाबत महाराष्ट्र शासन, राजपत्र दि. २९ **ऑक्टोबर, २०२६** रोजीच्या अधिसूचनेन्वये कळविणेत आलेले आहे. मा.विधानमंडळ कामकाजाने अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या तारांकित / अतारांकित प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख सूचना, अर्धा तास चर्चेची सुचना, कपात सुचना तसेच औचित्याचा मुद्दा, ठराव इत्यादी प्रश्नांबाबत तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती महाराष्ट्र शासनामार्फत मागणी करणेत येत असते. महानगरपालिकेशी संबंधित उपस्थित होणारे व प्राप्त झालेले तारांकित / अतारांकित प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख सूचना, अर्धा तास चर्चेची सुचना, कपात सुचना तसेच औचित्याचा मुद्दा, ठराव इत्यादी विषयांचे अनुषंगाने संबंधित विभागांकडे त्वरीत पाठविणेत येत असतात. सदर प्रश्नाद्वारे मागविण्यात आलेली माहिती हि मुदतीत व विनाविलंब उपलब्ध करुन देणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. महाराष्ट्र विधानमंडळ, नागपूर येथे दि. ०७ डिसेंबर,२०२६ पासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

- सर्व खाते प्रमुख यांनी विधिमंडळ कामकाजासाठी एक समन्वय अधिकारी, एक लिपिक टंकलेखक व एक शिपाई यांची नेमणूक करावी, व नेमणूक आदेश संबंधित अधिकाऱ्याच्या मोबाईल क्रमांकासह इकडील कार्यालयास विशेष दूतामार्फत पाठविण्यात यावा.
- विधीमंडळ अधिवेशनाचे कालावधीमध्ये विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी विधानमंडळाच्या कामकाजाचे संदर्भात प्राप्त होणाऱ्या प्रश्नांबाबत कालमर्यादेचे गांभीर्य व महत्व लक्षात घेऊन प्राप्त होणारे तारांकित / अतारांकित प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख सूचना, अर्धा तास चर्चेची सुचना, कपात सुचना तसेच औचित्याचा मुद्दा, ठराव इत्यादी यांची माहिती शासनास मा.आयुक्त सो. अथवा मा. अतिरिक्त आयुक्त यांचे मान्यतेने तातडीने स्वंय:स्पष्ट अहवाल, पत्र, पुरक टिपणीसह व विहित नमुन्यात मुदतीत तात्काळ शासनास सादर करणे आवश्यक आहे. तात्काळ पाठविणे बाबत दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे.
- विधानमंडळ अधिवेशन कालावधीत, विभागप्रमुख / शाखाप्रमुख तसेच संबंधित कर्मचारी यांनी आपले भ्रमणध्वनी व दूरध्वनी सुरु राहतील याची दक्षता घ्यावी. सदर बाबतच्या सूचना सर्व संबंधितांना

तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात. दिर्घ रजेवर न जाता सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कार्यालयाचे संपर्कात राहणे गरजेचे आहे.

- सदर कामकाजात विलंब, टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा झाल्यास, त्याबाबतची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची राहील, याची स्पष्टपणे [illegible] यावी. तसेच सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी त्यांचे अखत्यारीतील संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांना वरीलप्रमाणे कार्यतत्पर राहाणेकामी सक्त सूचना देणेत याव्यात.
- तारांकित प्रश्न / लक्षवेधी सूचना / अर्धातास चर्चा इ.बाबत अनेक वेळा विधिमंडळ ना येथे वेळेवर ब्रिफिंगसाठी उपस्थित राहावे लागते अशावेळी संबंधित खाते प्रमुख यांनी विधिमंडळ नागपूर येथे वेळेवर उपस्थित राहुन ब्रिफिंग देण्याची दक्षता घ्यावी. याबाबत विलंब झाल्यास संपुर्ण जबाबदारी ही खातेप्रमुख यांची राहील.
- अधिवेशनाच्या संबंधित एक बाब दोन अथवा त्यापेक्षा जास्त खात्याशी संबंधित असू शकते, अशा वेळी खातेप्रमुख यांनी समन्वय साधून कामकाज करावे व एकत्र उपस्थित राहून आयुक्त यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.
- अधिवेशनाचे संबंधित एखाद्या बाबीवर नक्की कोणत्या खात्याने कार्यवाही करावी असा संभ्रम अनेक वेळा तयार होतो. अशावेळी ही बाब आयुक्त यांचे निदर्शनास आणून द्यावी व त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी याबाबत खातेप्रमुख यांनी परस्पर निर्णय घेऊ नये.
- तसेच आपले विभागाचे संबंधित प्रलंबित असणारे प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना याबाबत शासनाकडे अहवाल / उत्तरे तात्काळ सादर करुन, त्याची प्रत सामान्य प्रशासन विभागाकडे prashasan@pcmcindia.gov.in या ई-मेल आयडीवीर खास दुताकरवी पाठविणेत यावी.
- विधिमंडळ विषयक बाबी संदर्भात कोणतीही माहिती विचारली असल्यास संपूर्ण अभ्यास करुन आणि त्यांनी तथ्याची वस्तूनिष्ठ खात्री करुनच उत्तर पाठविण्याची दक्षता घ्यावी. चुकीची माहिती / अपुर्ण माहिती / संदिग्ध स्वरुपाची माहिती उत्तरांमध्ये पाठवू नये. तसे आढळून आल्यास खाते प्रमुख हे शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी पात्र राहतील.
- अधिवेशनाशी संबंधित कामकाज हे प्राध्यान्यक्रमाने व काळजीपूर्वक हाताळण्यास यावे याबाबत कामात कचुराई व विलंब करणारे खातेप्रमुख हे शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.
- अधिवेशनात उपस्थित प्रश्नांबाबत Google Spreadsheet तयार करण्यात आली असून त्याबाबत विभागांनी शासनास सादर केलेल्या पत्राचा संदर्भ संबंधित विभागांनी Google Spreadsheet मध्ये भरण्यात यावा.

14

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – ४११ ०१८.

प्रत :-

१) मा.अतिरिक्त आयुक्त १,२, ३ कक्ष

२) सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख

२/- माहितीसाठी व योग्य त्या सत्वर कार्यवाहीसाठी.